प्लास्टिक कचरा विल्हेवाट लावण्यासंदर्भात मार्गदर्शक सूचना

- शेतामध्ये विविध प्रकारचे तणनाशके, कीटकनाशके यांचा वापर झाल्यानंतर यांचे डब्बे (छोटे- मोठे) व त्यांची झाकणे हे व्यवस्थित पूर्णपणे स्वच्छ धुवून साठवणूक करावेत व ते पुनःर्वापार साखळीमध्ये जाण्यासाठी नजीकच्या भंगार-दुकानात द्यावेत (मोठ्या प्रमाणात असल्यास विक्री करावी)
- अत्यंत घातक, विषारी घटक असलेले कीटकनाशके, तणनाशके व इतर डब्बे (छोटे अथवा मोठे) यांची विल्हेवाट लावताना, त्यांचे दगड किंवा काठीच्या साहाय्याने तुकडे करून ते खोल जमिनीत पुरावेत, अशा डब्ब्यांचा पुनर्वापर टाळावे
- कीटकनाशके - तणनाशके यांचे डब्बे पिशव्या धुवताना त्याचे पाणी विहिरीत-नदी नाल्यात जाऊ नये याची दक्षता येणेंकरून अन्नसाखळीवर परिणाम होणार नाही
- प्लास्टिक आवरण असलेल्या पिशव्या, याचबरोबर खते व बी-बियाणे यांच्या साठवणुकीची प्लास्टिक ची पोती आणि पिशव्या ई. यांचा शक्य तेवढा वापर - पुनःर्वापार करून झाल्यानंतर नजीकच्या भंगार-दुकानात देण्यात यावे
- नर्सरी मधील प्लास्टिक पिशव्या, प्लास्टिक-ट्रे, मल्चिंगसाठी वापरले जाणारे प्लास्टिक, शेड नेट च्या जाळया, शेती माल झाकण्यासाठी - वाळवण्यासाठी वापरण्यात येणारे प्लास्टिक, इतर प्लास्टिक आवरणे व साहित्य जसे कि प्लास्टिकचे हात मोजे, बूट इत्यादी साहित्य ते पुनःर्वापार साखळीमध्ये जाण्यासाठी नजीकच्या भंगार-दुकानात देण्यात यावे
- जमा केलेला प्लास्टिक कचरा (प्लास्टिक डब्बे, झाकणे, पिशव्या, लायनिंग्स) यामध्ये पाणी साठू देऊ नये
- भंगार दुकान जवळ नसल्यास तश्या प्रकारच्या सुविधा देणाऱ्या संस्थांमार्फत किंवा जवळच्या नागरपालिके मार्फत प्लास्टिक कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची सोय करावी
- कोणत्याही प्रकारे प्लास्टिक चा कचरा जाळू नये व तो इतरत्र पसरू नये याची दक्षता घेण्यात यावी
- कोणत्याही स्वरूपात विषारी घटक असणाऱ्या कीटकनाशके, तणनाशके यांच्या डब्ब्यांना (बाटली) यांची विल्हेवाट लावताना ते हाताला व शरीराला लागू नयेत याची काळजी घ्यावी.

सर्वप्रकारच्या प्लास्टिक वापरकर्त्याने प्लास्टिक कचरा व्यवस्थापन (दुरुस्ती) नियम २०१८ अंमल बजावणीसाठीची कृती
((महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब, शुक्रवार मार्च २३, २०१८/चैत्र २, शके १९४०)

1. वैयक्तिक व्यक्तींकडे सध्या उपलब्ध असलेल्या प्रतिबंधित प्लास्टिक वस्तूंच्या विल्हेवाटीसाठी - प्राधिकृत पुनर्चक्रन करणाऱ्या घटकांस किंवा उद्योगास विक्री किंवा

2. स्थानिक स्वराज्य संस्थेकडे शास्त्रीय विल्हेवाटीसाठी किंवा पुनर्चक्रनासाठी हस्तांतरण करणे